# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०१८-२०१९ या वर्षातील कार्याचा अहवाल
## [वर्ष ८४ वे]

**[प्रास्ताविक:-** अमृतमहोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करणारी आणि एकेकाळी बृहन्मुंबईतील बहुतेक सर्वच देशी खेळांचे तसेच सुमारे ८००-८५० संलग्न हुतुतु/कबड्डी मंडळे, शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था, व्यायाम संस्थांचे तसेच पोस्ट, तारखाते, गिरण्या, रेल्वे, बॅंका, कारखाने, पोलीस अशा विविध व्यावसायिक संस्थांचे खेळविषयक नियमन करणारी 'मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ' ही संस्था 'एक खेळ-एक संस्था' [वन गेम वन फेडरेशन] या तत्वामुळे या संस्था आणि देशी खेळ जरी बाजूला झाले तरी आजही आपल्या ध्येयान्वेषी कार्यामुळे शारीरिक शिक्षण व क्रीडा क्षेत्रात ताठ मानेने उभी आहे. दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन स्थापन झालेल्या संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्टयपूर्ण असे योगदान दिलेले आहे. त्यातुनच गेल्या ८३ वर्षात संस्थेने असंख्य खेळाडू, कार्यकर्ते, संशोधन मार्गदर्शक, तज्ञ आणि शिक्षक निर्माण केलेले आहेत. आजही मंडळाचे 'क्रीडाविश्व' हे त्रैमासिक, शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, फिटनेस सेंटर आणि मंडळाकडून प्रतिवर्षी घेतल्या जाणा-या आणि पुरस्कृत केल्या जाणा-या विविध खेळांच्या भव्य स्पर्धा तसेच आयोजित करण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम मंडळाच्या वैशिष्टयपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.]

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०१८-२०१९ या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. वर्षभरातील कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

**१.१ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षे कालावधीच्या दुस-या तुकडीच्या अभ्यासक्रमाच्या ४० व्या आणि एम.पी.एड. अभ्यासक्रमाच्या २१ व्या [२०१८-२०] शैक्षणिक वर्षाची सुरूवात अनुक्रमे दि.१८ सप्टेंबर,२०१८ रोजी व दि.२५ ऑक्टोबर २०१८ रोजी झाली. त्यादिवशी आयोजित करण्यात आलेला उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.संजय बाबुराव शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. बी.पी.एड. अभ्यासक्रमास १०० पदवीधरांनी [७१ पूरूष व २९ महिला] तर एम. पी.एड्. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमास एकूण २५ विद्यार्थ्यांना [१६ पूरूष व ९ महिला] प्रवेश दिला गेला. सदर प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाद्वारे पार पाडण्यात आली. बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाची सुरूवात दि.१९ जुलै २०१८ रोजी झाली.

**१.२ कुलपध्दती**

अधिक प्रभावी व परिणामकारकरित्या प्रशिक्षण देण्यासाठी आणि व्यवस्थापनदृष्टया सोयिस्कर व्हावे म्हणून सप्टेंबर महिन्यात बी.पी.एड. [प्रथम वर्ष] अभ्यासक्रमाच्या सर्व पुरूष प्रशिक्षणार्थ्यांचे आनंद, प्रताप, संग्राम व विजय अशा चार तर महिलांचे प्रगती व शक्ती अशा दोन समतुल्य कुलांमध्ये [गटांमध्ये] त्यांचे शैक्षणिक, क्रीडा आणि कला यातील संपादन लक्षांत घेऊन विभाजन करण्यात आले.

**१.३ आंतरराष्ट्रीय योग दिन-**

दि.२१ जून, २०१८ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग' दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्व शिक्षक सहभागी झाले होते.

**१.४ पायी पर्यटन/गिर्यारोहण /सहल**

अभ्यासेतर कार्यक्रमांच्या आयोजन व प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून दि.२० जुलै, २०१८ रोजी नेरळ ते माथेरान या निसर्गरम्य ठिकाणी पायीपर्यटन व गिर्यारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी बीपीएड अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी निसर्गाचा आनंद मनसोक्त लुटून नेरळ ते माथेरान व परत हे अंतर पायी चालून आपल्या शारीरिक सक्षमतेची चुणुक पटवून दिली.

## १.५ देशभक्तीपर गायन प्रशिक्षण व आंतरकुल समुहगान स्पर्धा

ऑगष्ट महिन्यात प्रसिध्द गायक श्री.सोमनाथ परब यांचे मार्गदर्शनाखाली बीपीएड प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता समुहगीत गायन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच दि.१५ ऑगष्ट, २०१८ रोजी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे व शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर देशभक्तीपर समुहगीतांच्या आंतरकुल स्पर्धा पार पडल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होऊन विविध वेश परिधान करून प्रभावीरित्या देशभक्तीपर समुहगीते सादर केली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दि.२२. डिसेंबर २०१८ रोजी प्रसिध्द संगितकार कै.वसंत देसाई यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवाजी पार्क, दादर येथे 'स्वरांजली' कार्यक्रमात सक्रिय भाग घेऊन समुह गीते गायली.

## १.६ राष्ट्रीय दिन आयोजन:-

प्रतिवर्षाप्रमाणे दि.१५ ऑगष्ट २०१८ या दिवशी 'स्वातंत्र दिन' तर दि.२६ जानेवारी २०१९ रोजी 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला.

## १.७ शिक्षक दिनानिमित्त स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धा

दि.५ सप्टेंबर,२०१८ रोजी शिक्षक दिनानिमित्त बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर दिवशी सर्व महाविद्यालयीन कामकाज मध्यान्हापर्यंत विद्यार्थ्यांनी व्यवस्थीत सांभाळून आपल्या कार्यक्षमतेची चुणूक पटवून दिली. शेवटी उत्कृष्ठ काम करणा-या खालील विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले-

- उत्कृष्ठ वर्ग विषय अध्यापन - श्रीमती दिपाली मिश्रा
- उत्कृष्ठ शारीरिक शिक्षण अध्यापन - श्री.जगन्नाथ शेटकर
- उत्कृष्ठ व्यवस्थापन कार्य - श्रीमती हर्षदा पाटील
- उत्कृष्ठ चतुर्थश्रेणी कर्मचारी - श्री.स्वप्नील गोलांबडे

## १.८ वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन-

दि.१४ ऑक्टोंबर २०१८ या दिवशी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यायात **'वाचन प्रेरणा दिन'** साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, संस्थेचे सचिव मा.श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर व महाविद्यालयाचे शिक्षक उपस्थित होते. माजी राष्ट्रपती स्व.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून समारंभाची सुरूवात झाली. प्रथम काही विद्यार्थ्यांना अब्दूल कलाम यांच्यावरील कवितांचे वाचन झाले. त्यानंतर राष्ट्रपती स्व.अब्दूल कलाम यांच्या जीवन चरित्रावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

## १.९ शैक्षणिक भेट -

दि.२२ ऑक्टोबर २०१८ रोजी बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमात शिकणा-या सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी महाराष्ट्र राज्य शासनाच्या बालेवाडी, पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलाला अभ्यास भेट देऊन तेथील विविध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सोयीसुविधांची माहिती मिळविली.

**१.१० राष्ट्रीय एकता दिन** - स्व.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त दि.३१ ऑक्टोंबर २०१८ रोजी 'राष्ट्रीय एकता दिवस' याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.संजय शेटे, सचिव मा.श्री.दिपक शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर तसेच महाविद्यालयासचे सर्व शिक्षक उपस्थित होते. समारंभाची सुरूवात स्व. सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होतो. नंतर डॉ.गो.वि. पारगांवकर यांनी सरदार पटेल व राष्ट्रीय एकता यावर आपले विचार मांडले. आपल्या अध्यक्षिय भाषणात मा.श्री.संजय शेटे साहेबांनी त्यांना लोक लोहपुरूष असे का संबोधतात व राष्ट्रीय एकता विषयी स्व.सरदार यांचे विचार काय होते याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. यानंतर डॉ.ढाकणे यांनी राष्ट्रीय एकता दिवसाच्या शपथेचे वाचन केले. राष्ट्रगीतानंतर राष्ट्रीय एकता दिवसाची सांगता झाली.

## १.११ भारतीय संविधान दिनाचे आयोजन

दि.२६ नोव्हेंबर,२०१८ रोजी संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात **'संविधान प्रास्ताविक वाचन आणि भित्तीपत्रक प्रदर्शन'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**१.१२ बालवीर व वीरबाला प्रशिक्षण शिबिर–**

बीपीएड [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ डिसेंबर ते २२ डिसेंबर, २०१८ या कालावधीत पनवेल नजिक 'शांतीवन' येथील निसर्गरम्य परिसरात ६ दिवसांचे स्काऊट व गाईड प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. सदर शिबिराला रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिध्देश्वर गडदे तसेच कुष्ठरोग निवारक समितीच्या कार्याध्यक्षा सौ.मीनाताई व सचिव श्री. प्रभू देसाई इ. मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांनी केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून त्यांना मार्गदर्शन केले.

**१.१३ आंतर–शालेय हिंद करंडक स्पर्धा [कबड्डी, खो–खो, लंगडी]**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीदिखील संस्थेच्यावतीने महाविद्यालयाने घेतलेल्या आंतरशालेय हिंदकरंडक स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी आयोजित करून यशस्वीरित्या पार पाडल्या. दि. ४ ते १० जानेवारी, २०१९ या कालावधीत घेतल्या गेलेल्या कबड्डी, खो–खो व लंगडी या खेळांच्या सदर स्पर्धेत विविध शाळांच्या १६३२ मुला–मुलींनी भाग घेतला होता.

**१.१४ आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन :–**

म्हाविद्यालयाच्यावतीने दि.१५ जानेवारी २०१९ रोजी अभाविप, मध्य मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन केले. त्यात मुंबई विद्यापीठ व संलग्न असलेल्या १८ महाविद्यालयांनी भाग घेतला.

**१.१५ आंतरराष्ट्रीय परिषदेत विद्यार्थी व शिक्षक सहभाग**

दि.१६ ते १७ जानेवारी २०१९ या कालावधीत डॉ.आंबेडकर महाविद्यालय नागपूर यांनी 'क्रीडा मानसशास्त्र व योगिक शास्त्रे या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे २१ विद्यार्थी व दोन शिक्षकांनी भाग घेवून खालीलप्रमाणे विविध शोधनिबंध व पोस्टर्स सादर करून लक्षणीय शैक्षणिक कार्य केले.

- **List of students presented paper :**

| Sr.No. | Name of the Students | Title of the Paper |
|---|---|---|
| 1 | Ambrita More,<br>Dr. Neetu Joshi (Asstt. Prof) | A Study of Effect of Plyometric Training Programme of Self Concept of Artistic Gymnasts of Mumbai City (I Place) |
| 2 | Jaspreet Kaur,<br>Dr Neetu Joshi (Asstt. Prof) | Effect of Judo Training Programme on Aggression of College Students of Mumbai Suburban |
| 3 | Bhagyashri Bhilare,<br>Adarsh Kalapurathu,<br>Dr. Sushama Chougule (Asstt. Prof) | Effect of Specific Training Programme on Aggression of Kabaddi Players of Mumbai (III Place) |
| 4 | Pratiksha Kshirsagar,<br>Priyesh D'Souza<br>Dr. R.R. Dhakne (Asstt. Prof) | A Comparative Study of Pre Competitive Anxiety Between Junior College Volleyball and Football Players of Mumbai |
| 5 | Ganesh Yadav,<br>Gayasuddin Balwar,<br>Dr. G.K. Dhorkat (Asstt. Prof) | Comparative Study on Aggression between Karate and Boxing Players of Mumbai City |
| 6 | Anwaruzzama Khan,<br>Manoj Verma | A Comparative Study of Mental Health Between Volleyball and Cricket School Players Aged 12 to 14 Years of Thane City |
| 7 | Deepali Torkadi,<br>Atul Shinde | Effect of Football Training Programme on the Stress of Students of Mumbai |
| 8 | Swapnali Tambe | Effect of Specific Training Programme on Stress of Softball Players of Navi Mumbai (II Place) |

- **List of students Poster Presentation Groups :**

| Sr. No. | Name of the Students | Title of the Paper |
|---|---|---|
| 1 | Shwetali Kode<br>Dipali Patil<br>Sachin Girane<br>Madhuri Gaikhe | Effect of Yogic Practices on Anxiety of National Cadet Corps of Mumbai (II Place) |
| 2 | Deepali Torkadi<br>Snehal Khobarekar<br>Pradnya Dound | Effect of Aerobic Exercises on Mental Health of Junior College Girls (III Place) |
| 3 | Vaishali Gupta<br>Bhagyashri Bhilare<br>Madhuri Gaikhe<br>Yogesh Bankar | Effect of Yogic Practices on General Wellbeing of Senior College of Mumbai (I Place) |

**१.१६ राष्ट्रीय कार्यशाळेत सहभाग**

महाविद्यालयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे खालील १४ विद्यार्थी व दोन शिक्षकांनी दि. १६ ते २२ जानेवारी २०१९ या कालावधीत राष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, भारत सरकार, इंफाळ, मणिपूर आयोजित इंफाळ येथे झालेल्या क्रीडा व व्यायाम मनोविज्ञानाची संशोधन पध्दती या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेत सहभागी झाले होते.

| Sr. No. | Name of the Students | Class |
|---|---|---|
| 1 | Vaishali Gupta | M.P.Ed.-II |
| 2 | Priya Jadhav | M.P.Ed.-II |
| 3 | Snehal Khule | M.P.Ed.-II |
| 4 | Jagruti Patil | M.P.Ed.-II |
| 5 | Aishwarya Shinde | M.P.Ed.-II |
| 6 | Deepali Torkadi | M.P.Ed.-II |
| 7 | Randhir Bagal | M.P.Ed.-II |
| 8 | Mayur Chavan | M.P.Ed.-II |
| 9 | Sanjay Darawade | M.P.Ed.-II |
| 10 | Ajay Dhundle | M.P.Ed.-II |
| 11 | Anil Ganganmalle | M.P.Ed.-II |
| 12 | Bhavesh Gulvi | M.P.Ed.-II |
| 13 | Saroj Shyamnarayan | M.P.Ed.-II |
| 14 | Dipli Patil | Ph.D. Scholar |
| 15 | Dr. Rajendra Dhakne | Asstt. Prof. |
| 16 | Dr. Neetu Joshi | Asstt. Prof. |

**१.१७ फिटनेस ट्रेनिंग व मॅनेजमेंटचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम–**

अहवालसाली महाविद्यालयाने गायो फिटनेस ॲकॅडेमी यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई, अहमदाबाद व त्रिवेंद्रम या ठिकाणी फिटनेस ट्रेनर व फिटनेस सेंटर मॅनेटमेंट प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात आले त्यातुन महाविद्यालयास संस्थेस अहवालसाली रू.४.०० लाख ६६/– इतका निधी उपलब्ध झाला.

**१.१८ आंतर–शालेय लेझीम स्पर्धा:–**

प्रतिवर्षीप्रमाणे मंडळाच्यावतीने कै. दत्ताराम लाड फिरत्या चषकाच्या आंतर शालेय लेझीम स्पर्धा २९ जानेवारी,२०१९ रोजी झाल्या. त्यात १४ शाळांच्या सुमारे १०८५ मुला–मुलींनी भाग घेतला. पहिल्या तीन विजयी शाळांना संस्थेतर्फे रोख बक्षिसे व स्मृतिचिन्हे देण्यात आली. शिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व शाळांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली.

स्पर्धेचे उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या [धारावी] मुख्याध्यापिका मा.सौ.विना दोलवलकर, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे जनरल सेक्रेटरी मा. श्री.दिपक बाबूराव शेटे, प्राचार्य डॉ.सिध्दार्थ कांबळे, डॉ.आंबेडकर कॉलेज, वडाळा, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि.पारगांवकर, मंडळाच्या कार्यकारी समिती सदस्या श्रीमती नलिनी फडणीस, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, स्पर्धाप्रमुख डॉ.रोहिणी चंद्रकांत कवडे आदि मंडळी उपस्थित होती.

**१.१९ राष्ट्रीय खेळ दुखापती व प्रथमोपचार व्यवस्थापन कार्यशाळा** [Workshop on Sports Injury and First Aid Management ] -

गायो फिटनेस अकॅडेमी [Gayo Fitness Academy] यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर ‘खेळातील दुखापती व प्रथमोपचार व्यवस्थापन या विषयावर दि.२ ते ३ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यावेही भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे वरिष्ठ स्पोर्टस फिजिओथेरपीस्ट डॉ.मिनाक्षी ढाका व डॉ.अक्षत पांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत देशभरातील क्रीडाक्षेत्रातील १२५ व्यक्तींनी भाग घेतला.

**१.२० राष्ट्रीय कुष्ठरोग जागृती कार्यक्रम** -

दि.९फेब्रुवारी २०१९ रोजी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन पंधरवडयानिमित्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कुष्ठरोगाबाबत जनजागृतीसाठी शास्त्रीय माहिती ॲकवर्थ लेप्रसी हॉस्पीटल व रिसर्च सेंटर सोसायटी मुंबई यांचेमार्फत देण्यात आली.

**१.२१ मराठी भाषा गौरव दिन** -

दि.१७ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयात ‘मराठी भाषा गौरव दिन’ साजरा करण्यात आला. त्यावेळी विद्यार्थ्यांनी काव्य वाचन, कविता वाचन केले तसेच **‘मराठी भाषा विकास’** यावर व्याख्याने झाली.

**१.२२ ॲथलेटिक्स प्रशिक्षण व मैदानी स्पर्धा**

बीपीएड अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांना ७ दिवसांच्या कालावधीसाठी मार्च २०१९ मध्ये विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक धावन मार्गावर ॲथलेटीक्सचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच दि.१५ मार्च २०१९ रोजी बीपीएड द्वितीय वर्षाच्या वार्षिक मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. त्यावेळी उद्‌घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. संजय शेटे तर समारोप प्रसंगी मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.उत्तम केंद्रे व वागळे स्पोर्टस् कंपनीचे मालक श्री.मनोहर वागळे इ. मान्यवर उपस्थित होते. सदर स्पर्धेत गुणाधिक्याने कुलास विभागून विजेतेपद मिळाले.

**१.२३ रक्तदान शिबीर–**

महाविद्यालयाने दि.१२ एप्रिल, २०१९ रोजी सर जे.जे. हॉस्पीटल महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले त्यावेळी महाविद्यालयाच्या ८१ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून एक उत्कृष्ठ सामाजिक व राष्ट्रीय कार्य केले.

**१.२४ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ–**

दि.२९ मे,२०१९ रोजी मुंबई विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री.संजय बाबूराव शेटे, प्राचार्य डॉ.गो.वि पारगांवकर हे मान्यवर उपस्थित होते.

**१.२५ मुल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन–**

अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी Certificate Course In Personal Fitness Training(CCPFT) आणि Certificate Course In Fitness Centre Management (CCFCM) हे अल्पकालिन मुल्यवर्धित अभ्यासक्रम राबविण्यात आले त्यात बीपीएड द्वितीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन सदर दोन्ही अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले तसेच अहवालसाली बीपीएड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता कबड्डी, खो-खो, लंगडी, ॲथलेटिक्स व हॉलीबॉल या खेळांच्या पंच प्रमाणपत्र परीक्षांचे (Value added programme) आयोजन करण्यात आले.

## १.२६ विस्तार कार्य

अहवालसाली महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी विविध संस्था आणि शाळांनी आयोजित केलेल्या खालील विविध उपक्रमात पंच / अधिकारी म्हणून भाग घेवून त्याद्वारे त्यांना स्पर्धा / उपक्रम आयोजनाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला---

१. सुविद्यालय हायस्कूल, [बोरीवली] आयोजित सूर्यनमस्कार स्पर्धा- दि.३० जुलै,२०१८
२. स्वातंत्रवीर सावरकर आर्चरी अकॅडेमीद्वारा आयोजित एस.एफ.आय. आर्चरी स्पर्धा, डी.वाय. पाटील स्टेडियम, नेरूळ - दि.१३ व १४ डिसेंबर २०१८
३. मुंबई स्पोर्टस स्कूल्स असोसिएशनद्वारा आयोजित आंतरशालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा, भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई- दि.८ व ९ डिसेंबर २०१८ व दि.११, १२, व १२ जानेवारी २०१९.
४. ठाणे जिल्हा परीषदेच्या शिक्षण विभागाद्वारा आयोजित ठाणे जिल्हा शालेय स्पर्धा, बदलापूर - दि.८ जानेवारी २०१९
५. गोखले एज्यु.सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाद्वारे आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा, कामगार मैदान, परळ- दि.८ फेब्रुवारी २०१९
६. मुंबई विद्यापीठ आयोजित २२ वी महाराष्ट्र राज्य आंतर महाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धा- दि.१४ ते १८ फेब्रुवारी २०१९.
७. महाराष्ट्र राज्य ॲमॅच्युअर अक्वॅटीक असोसिएशनद्वारा आयोजित ५७ वी संक रॉक गेटवे जलतरण स्पर्धा २०१९, गेट वे ऑफ इंडिया, मुंबई- दि.२४ फेब्रवारी २०१९
८. मुंबई शहर जिम्नॅस्टिक्स असोसिएशनद्वारा आयोजित टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा- दि.२ मार्च,२०१९
९. महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालयद्वारा आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ, गेटवे ऑफ इंडिया - दि.१७ फेब्रुवारी २०१९
१०. मुंबई शहर हॉलीबॉल संघटनेतर्फे आयोजित मुंबई महापौर चषक हॉलीबॉल स्पर्धा, भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मंबई- दि.२२ ते २४ मार्च २०१९

## १.२७ शारीरिक शिक्षण संशोधन केंद्राचे कार्य

महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सर्वप्रथम १९९६ साली सुरू केलेल्या संशोधन केंद्रातून आजपर्यंत एकूण ४७ संशोधकांनी आपले संशोधन कार्य पूर्ण करून मुंबई विद्यापीठाची शारीरिक शिक्षण विषयाची विद्यावाचस्पती [पी.एच.डी.] पदवी प्राप्त केली आहे. अहवालसाली संशोधन केंद्रात ३० संशोधक/विद्यार्थी संशोधनात्मक कार्य करीत होते. त्यापैकी वर्षभरात खालील १२ विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी प्राप्त झाली---

| Sr. No. | Name of the Scholar | Name of the Guiding Teacher |
|---|---|---|
| 1 | Smt. Chougule Sushama Narayan | Dr. R.R. Dhakne |
| 2 | Shri. Kateshiya Rajesh Ramniklal | Dr. G.K. Dhokrat |
| 3 | Shri. Tambare Sachin Hari | Dr. R.R. Dhakne |
| 4 | Smt. Lobo Mini Charlotte | Dr. R.R. Dhakne |
| 5 | Smt. Shelatkar Veena Sandeep | Dr. R.R. Dhakne |
| 6 | Shri. Pawar Sunil Bhagwan | Dr. G.K. Dhokrat |
| 7 | Shri. Kateshiya Rajesh Ramniklal | Dr. G.K. Dhokrat |
| 8 | Shri. Salve Vishal Suresh | Dr. G.K. Dhokrat |
| 9 | Smt. Gill Monica Victor | Dr. G.V. Pargaonkar |
| 10 | Smt. Gill Monica Victor | Dr. G.V. Pargaonkar |
| 11 | Shri. Sandeepkumar Rampal Punia | Dr. G.V. Pargaonkar |
| 12 | Shri. Gaikwad Ramanand Nagnath | Dr. K.K. Asai |

## १.२८ अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia (please specify whether it was a Seminar / Conference/ Symposia as the case may be) | Name of the Organizer | Date & Place | Title of the Paper presented/ read |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. R.R. Dhakne Asstt Prof. | Workshop on 'New API as per UGC Amendments', | University of Mumbai & Vidya Prasarak Mandals K.G. Joshi College of Arts & N.G. Bedekar College of Commerce, Thane. | July 06, 2018 | Participated |
| | | National Workshop on "Research Methodology in Sports & Exercise Psychology" | National Sports University, Imphal, Manipur. | Jan. 16-22, 2019 | Participated |
| | | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |
| 2 | Dr. G.K. Dhokrat Asso. Prof. | 1st Conference on Interdisciplinary Approach in Sports | Faculty of Sports Science, university Negeri Yogyakarta, Indonesia | October, 26-27, 2018 | Positive Mental Health and Its Association With Posture : With Reference to School Children |
| 3 | Dr. N.O. Josh Asstt. Prof. | Workshop on 'New API as per UGC Amendments', | University of Mumbai & Vidya Prasarak Mandals K.G. Joshi College of Arts & N.G. Bedekar College of Commerce, Thane. | July 06, 2018 | Participated |
| | | 3rd National Conference on Self-Employability Skills Development in Physical Education & Sports Sciences | Department of Physical Education & IQAC S.G.B. Amravati University | Dec. 13-14, 2018 | "Effect of Specific Training Programme on Optimum Health of Kho-Kho players of Mumbai". |
| | | National Workshop on "Research Methodology in Sports & Exercise Psychology" | National Sports University, Imphal, Manipur. | Jan. 16-22, 2019 | Participated |
| | | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |
| 4 | Dr. S.N. Chougule Asstt. Prof. | National Level Seminar on Gender Equality and Women Empowerment | Adarsh College of Arts, Nijampur-Jaitane | October 20, 2018 | Status of Women in Indian Sports |
| | | National Conference on Role of Physical Education and Other Disciplines in Enhancing the Performance of Players and Fitness | IQAC, Badnera-Amravati | December 24, 2018 | The Role of Technology in Sports |
| | | International Congress on Renaissance in Sports Strategies, Challenges and Choices | National College, Tamil Nadu | January 06-10, 2019 | Dawn of Kabaddi as an Indigenous Sport |
| | | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |
| | | 1st International Conference in Education | Department of Special Education, SNDT University | January 18-19, 2019 | Be the Difference : Equality and Equity in Education |
| | | International Multidisciplinary Conference on 'World Road to Cashless Economy | Clara's College of Commerce, Varsova, Mumbai-61, | March, 16, 2019 | Golden Year for Fitness |
| | | Multidisciplinary International Conference on Changing Perspectives in Management, Humanities, Science & Technology | A.E.Kalsekar Degree college Kansa, Mumbra, Thane | March, 23, 2019 | Battle with Generalized anxiety disorder. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Dr. K.J. Maru Asstt. Prof. | Workshop on 'New API as per UGC Amendments' | University of Mumbai & Vidya Prasarak Mandal's K.G. Joshi College of Arts and N.G. Bedekar College of Commerce, Thane | July 6, 2018 | Participated |
| | | 3rd National Conference on Self-Employability Skills Development in Physical Education & Sports Sciences | Department of Physical Education & IQAC S.G.B. Amravati University | Dec. 13-14, 2018 | Effect of Super Set Weight Training on Post Skill Performance Perceived Exertion Rate of Judo Players |
| | | NAAC sponsored symposium 'Measures for Quality Enrichment and Sustenance in Higher Education Institutions | University of Mumbai | January 18, 2018 | Effect of Pranayama and Mudras on Emotional Stability and over-all Adjustment of Junior College students |
| | | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |
| 6 | Dr. R.C. Kawade Asstt. Prof. | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |
| 7 | Dr. R.N. Shelke Asstt. Prof. | Workshop on Sports Injuries Early Identification & Management | University of Mumbai & B.P.C.A's college Physical Education, Wadala Mumbai – 400 031. | February 02-03, 2019 | Participated |

**ब.शिक्षकांद्वारे प्रकाशन कार्य :**

अहवालसाली महाविद्यालयाच्या खालील शिक्षकांनी खालील महत्वपूर्ण लेखन / प्रकाशन कार्य केले.

| | |
|---|---|
| 1 | **Dr. N.O. Joshi** "Effect of Judo Training Programme on Aggression of College Students of Mumbai Suburban", **Research Chronicler e-ISSN 2347-503X- International Multidisciplinary Research Journal-Digital Edition-Feb-2019, Vol. No. 88-93,** |
| | **Dr. N.O. Joshi** "A Study of Effect of Plyometric Training Programme on Self Concept of Artistic Gymnasts of Mumbai City", **Research Chronicler e-ISSN 2347-503X- International Multidisciplinary Research Journal-Digital Edition-Feb-2019, Vol.No.38-43,** |
| 2 | **Dr. S. N. Chougule** "Status of Women in Indian Sports", **ISBN:978-93-87129-95-5, National Level Seminar, 20th October, 2018.** |
| | **Dr. S. N. Chougule** "The Role of Technology in Sports", **ISSN:2349-638X Impact Factor:4.574, National Conference, Peer Reviewed and Indexed Journal, 24th December, 2018.** |
| | **Dr. S. N. Chougule** "Dawn of Kabaddi as an Indigenous Sport", **ISSN:2320-5202, UGC Sponsored International Congress, 6th to 10th January, 2019.** |
| | **Dr. S. N. Chougule** "Gender Discrimination: Burning Issue in Sports", **ISBN 978-93-82884-99-6, International Conference, January 18-19, 2019.** |
| | **Dr. S. N. Chougule** "One Day-Day one", **ISSN:2278-487X p-ISSN:2319-7668, IOSR-Journal, March, 2019.** |
| | **Dr. S. N. Chougule** "Golden Years for Fitness", **ISSN:2394-7780 Volume 6, Issue 1 (XXXVIII) Journal No.63571, International Multidisciplinary Conference, 16th March, 2019.** |
| | **Dr. S. N. Chougule** "Battle with Generalized anxiety disorder", **ISSN:2394-7780 Volume 6, Issue 1 (XXXV) Journal No.63571, Internal Multidisciplinary Conference, 23rd March, 2019.** |
| 3 | **Dr. K.J. Maru**, "Effect of Super Set Weight Training on Recovery Heart Rate of Judo Players", **e-ISSN 2347-503X, p-ISSN-2347-5021, Vol. VII. SPL, Issue-I-Feb 2019** |
| | **Dr. K.J. Maru**, "Effect of Taekwondo Training For the Promotion of Mental Health of School Girls", **Ajanta-ISSN2277-5730-Impact Factor – 5.5, Vol. VII. SPL, Issue-I-Jan-March 2019** |

## क. शिक्षकांचे विशेष कार्य

1. Dr. G.V.. Pargaonkar, worked as ***IQAC Member*** of Dr. Amberdkar College of Commerce and Economics, Wadala, Mumbai – 31.
2. Dr. G.V. Pargaonkar, worked as ***Member (Subject Expert) on Research and Recognition Committee*** for the subject of Physical Education under the faculty of Inter-disciplinary studies of Savitribai Phule Pune University and the University of Mumbai.
3. Dr. G.V. Pargaonkar, worked ***on scrutiny /committee*** of ***Shivaji University for Director of Sports & Physical Education*** post.
4. Dr. G.V. Pargaonkar, worked as Expert ***on the committee*** appointed by the ***NAAC for preparing revised manual of A & A for Teacher Education Institution*** on 12-13 February, 2019, Bengluru.
5. Dr. G.K. Dhokrat, worked as ***Visiting Team Member of NCTE*** *for affiliation of B.Ed. Integrated programme of IASE, GANDHI VIDYA MANDIR, Sardarshar, Dist Churu, Rajasthan on 24th & 25th August, 2018*
6. Dr. G.K. Dhokrat, worked as ***Visiting Team Member of NCTE*** *for affiliation of B.P.Ed. Programme of Mangalore University, Mangalore on 28th February & 1st March, 2019.*
7. Dr. G.K. Dhokrat, worked as ***Chairperson in National Conference*** *on Anti-Doping, Physical Education & Sports Science, Organized by* ***SRTM University, Nanded*** *on 27-28 March, 2019*
8. Dr. N.O. Joshi worked as ***Chairperson at the International Conference*** on Sports Psychology & Yogic Sciences held between 16-17th February, 2019 Organized by **Department of Physical Education & Sports & IQAC**, Dr. Ambedkar College, Deekshabhoomi, Nagpur.
9. Dr. N.O. Joshi worked as an *Examiner by National Sports University*, Imphal, Manipur for the Semester Examination of II & III Semester 2018-19 (May) B.Sc. (Sports Coaching), B.P.E.S, M.A.(Sports Psychology)Subjects: II Semester M.A.(Sports Psychology)- Social Psychology in Sports, III Semester B.P.E.S – Movement Education
10. Dr. N.O. Joshi worked as an *Examiner by Lakshmibai National Sports University, Gwalior for the Semester VI* Examination 2018-19 of II & III Semester 2018-19 (May) B.Sc. (Sports Coaching), B.P.E.S, M.A.(Sports Psychology)Subjects: II Semester M.A.(Sports Psychology)- Social Psychology in Sports, III Semester B.P.E.S – Movement Education

## १.२९ आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेतील विद्यार्थी सहभाग

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी आंतर-महाविद्यालयीन राज्य, राष्ट्रीय व आंतर-विद्यापीठीय स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेत भाग घेवून उल्लेखनीय कामगिरी केली-

### अ. वैयक्तिक कामगिरी

#### १ धर्नुविद्या

- जगन्नाथ शेटकर **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
  आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेत द्वीतीय क्रमांक व आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभाग

#### २ सॉप्टबॉल/हण्डबॉल

- /गावंड चेतना **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व आंतर विद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग.

- /कापुरे हेमांगी **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व दि.२८ आक्टोबर ते १ नोव्हेंबर २०१८ रोजी पुणे येथे झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग.

- शिंदे रामेश्वर **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक तृतीय स्थान व दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग व दि.१ आक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१८ रोजी लातूर येथे झालेल्या आंतर विद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग. दि.२७ ते ३० मार्च २०१९ रोजी कुरूक्षेत्र येथे झालेल्या आंतरविद्यापीठ बेसबॉल स्पर्धेत सहभाग.

- /ठक्कर राधिका **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सांघिक चतुर्थ स्थान व आंतर विद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग. आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत सहावे स्थान व बॉलबॅडमिंटन स्पर्धेत आठवा क्रमांक.

- राणे प्रथमेश **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक तृतीय स्थान व दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग व आंतर विद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग. आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच स्पर्धेत सहभाग.

- नन्हे ओमकार **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक तृतीय स्थान व आंतर विद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत सहभाग. आंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन स्पर्धेत सहभाग.

- कदम अक्षय **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  दि.१९ आक्टोबर २०१८ रोजी सी.के.टी महाविद्यालय, पणवेल येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग. दि.१ आक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१८ रोजी लातूर येथे झालेल्या आंतर विद्यापीठ सॉप्टबॉल स्पर्धेत सहभाग व मुंबई विद्यापीठ संघाचा नेता म्हणून निवड.

**३ रस्सीखेच**

- काझी मोझेझ रियाझ **[बीपीएड – द्वितीय वर्ष]**

आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग. राज्यस्तरीय स्पर्धेत सांघिक प्रथम स्थान. राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग.

**४ खो–खो**

- /कामथे अनुराधा **[बीपीएड – प्रथम वर्ष]**

मुंबई विद्यापीठ आयोजित अश्वमेध मुंबई येथे झालेल्या खो-खो स्पर्धेत सहभाग.
आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स ४ X १०० मिटर रिले स्पर्धेत पाचवा क्रमांक.

**५ ज्युडो**

- यश राजे **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  मरीन लाईन्स मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत दुसरा क्रमांक.
- प्रफुल सिंग **[बीपीएड – प्रथम वर्ष]**
  मरीन लाईन्स मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन ज्युडो स्पर्धेत दुसरा क्रमांक.

**६ हॅण्डबॉल/ ॲथलेटीक्स**

- अभिषेक निजई **बीपीएड – द्वितीय वर्ष]**
  दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत सांघिक तृतीय स्थान व आंतर महाविद्यालयीन ४०० मीटर हर्डल्स मध्ये तृतीय स्थान.

**ब. <u>सांघिक कामगिरी</u>**

**१ बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**

दि.६ आक्टोबर २०१८ रोजी रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, खारघर नवी मुंबई येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन हण्डबॉल स्पर्धेत पुरूष संघ सांघिक तृतीय स्थान.

- भट्टाचार्य रथीन
- भोईर भूषण
- गुरव भरत
- पाटील दिपेश
- पाटील करण
- मंगेला नरेश
- लाड राजेंद्र
- गावडे वासूदेव
- नन्हे ओमकार
- राणे प्रथमेश
- सुब्रोतो रॉय
- सोधा अजयसिंग
- वल्गडे अंकुश
- देशमुख यशराज
- जाधव संदिप
- निजई अभिषेक
- कुंभार राहुल

**२ बीपीएड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष**

